ठाणे, बुधवार दि. ०६ मे २०२६ वर्ष : १५, अंक : ०८, पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

मुख्य संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**आव्हान थंडावले**

केंद्रातील महाकाय भाजप सकारच्या विरोधात निर्धाराने लढणाऱ्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी तर तमिळनाचे मुख्यमंत्री एम. स्टॅलिन यांच्या विधानसभा.....पान २ वर

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. यात भाजपने दणदणीत विजय मिळवला आहे. आता तृणमूल काँग्रेसच्या मोठ्या पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यांनी म्हटले की, आम्ही निवडणूक हरलो नाही, आम्हाला हरवण्यात आले आहे. भाजपाने निवडणूक आयोगाचा वापर करून विजय मिळवला आहे. तसेच पुढे बोलताना त्यांनी मी राजीनामा देणार नाही असं विधान केलं आहे.




## ममता बॅनर्जींचा हल्लाबोल, म्हणाल्या, आम्ही निवडणूक हरलो नाही, आम्हाला निवडणूक आयोगाने हरवलं; मी राजभवनात जाणार नाही,

# ममता बॅनर्जी यांचा राजीनामा देण्यास नकार

तृणमूल काँग्रेसच्या मोठ्या पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी पत्रकार परिषद घेतली. यात त्यांनी निवडणूक आयोग आणि भाजपवर गंभीर आरोप करत मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला आहे.

ममता यांनी म्हटलं की, 'आमची लढाई भाजपाशी नव्हती, तर निवडणूक आयोगाशी होती. माझ्या आयुष्यात मी असा निवडणूक प्रकार कधीच पाहिला नाही. 2004 नंतर इतका अत्याचार मी पाहिलेला नाही. निवडणूक आयोग हा मुख्य खलनायक आहे. एसआयआरमुळे 90 लाख मतं काढून टाकली गेली. भाजपाने 100 जागांची लूट केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी मिळून आम्हाला हरवले. भाजपाने प्रत्येक प्रकारचा डावपेच वापरून आम्हाला पराभूत केले. भाजप कार्यकर्त्यांनी आमच्या कार्यकर्त्यांवर मारहाण केली.'

### माझ्या राजीनाम्याचा प्रश्नच नाही

ममता बॅनर्जी यांनी राजीनाम्याच्या प्रश्नावर म्हटले की, 'माझ्या राजीनाम्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आम्ही निवडणूक हरलो नाही.' राजभवनात जाणार का, असे विचारले असता ममता यांनी सांगितले की, 'मी राजभवनात जाऊन राजीनामा देणार नाही. पक्षातील सदस्यांसोबत पुढील रणनीतीवर चर्चा केली जाईल. आता मी भाजपाच्या अत्याचारांना अधिक सहन करणार नाही. मी रस्त्यावर उतरून लढा देईन.'

### इंडिया आघाडी माझ्यासोबत

पुढे बोलताना ममता यांनी म्हटले की, 'इंडिया आघाडी माझ्यासोबत आहे. सोनिया गांधी यांनी मला फोन केला. राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, उद्धव ठाकरे, हेमंत सोरेन आणि तेजस्वी यादव यांनीही मला फोन करून पाठिंबा दर्शवला. उद्या अखिलेश यादव येणार आहेत. आता मी स्वतंत्र पक्ष्यासारखी आहे. मला काही कामे करायची आहेत, पण आम्ही लढा सोडणार नाही.

### भाजपवर गंभीर आरोप

भाजपवर आरोप करताना ममता म्हणाल्या की, 'भाजपाने आमच्या लोकांवर अत्याचार सुरू केले आहेत. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या कुटुंबांवरही हल्ले झाले. भाजपाने त्यांना धमक्या दिल्या. भाजपाने आपल्या गुंडांच्या मदतीने हल्ले सुरू केले आहेत आणि पोलीस निष्क्रिय आहेत. भाजपाच्या कार्यकर्त्यांनी माझ्यावरही हल्ला केला. माझ्या पाठीवर आणि पोटावर लाथा मारण्यात आल्या.'

## पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्रीपद कुणाला?

पश्चिम बंगालच्या नवीन मुख्यमंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्याची तारीख जाहीर करण्यात आली आहे. पश्चिम बंगालचे नवीन मुख्यमंत्री कोण होणार याचे नाव जवळपास निश्चित झाले आहे, याबाबतीच माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष सामिक भट्टाचार्य यांनी एएनआयला दिली आहे. बंगालमध्ये भाजपने ऐतिहासिक विजय मिळवला आहे. येथे भाजपने २०६ जागा जिंकल्या आहेत. तर ममता बॅनर्जी यांचा टीएमसी पक्षाने ८० जागा जिंकल्या आहेत. यादरम्यान भाजपमधील पक्षश्रेष्ठी कोणाच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ टाकणार याबाबत चर्चांना उधाण आले आहे.

**९ मे रोजी होणार नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा?**

९ मे रोजी होणार नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा? - हाती आलेल्या माहितीनुसार,ममता बॅनर्जी यांना पराभूत **(पान 2 वर )**

■ नसरापूर घटनेनंतर महाराष्ट्र कॅबिनेटचा मोठा निर्णय

# लैंगिक शोषण करणाऱ्या नराधमांना पॅरोल देऊ नका, मुख्यमंत्र्यांचे निर्देश

पुण्यातील नसरापूर येथे घडलेल्या साडेतीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार आणि हत्या प्रकरणावरून संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणानंतर सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. या प्रकरणानंतर आता महाराष्ट्राच्या आजच्या कॅबिनेट बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. लैंगिक शोषण करणाऱ्या नराधमांना पॅरोल देऊ नका, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

आज मंत्रालयात कॅबिनेट बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल देऊ नका, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॅबिनेट बैठकीत दिले आहेत. लैंगिक प्रकरणातील आरोपी हे 80 ते 90 टक्के त्याच गुन्ह्यात अटक होऊन पॅरोलवर सुटलेले असतात आणि त्या काळात ते परत तेच गुन्हे करतात. 2014 ते 2019 या काळात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना अशा गुन्ह्यातील आरोपींना पॅरोल देऊ नका, असा कायदा केला होता. तो 2-3 वर्ष अस्तित्वात होता. पण कालांतराने तो न्यायालयाने रद्द केला. आता पुन्हा तसाच कायदा करा, असे निर्देश देवेंद्र फडणवीसांनी विधी व न्याय विभागाला दिले आहेत.



### नसरापूरमधील प्रकरणावर फडणवीस म्हणाले होते...

मी स्वत: पीडितेच्या वडिलांशी दोनवेळा बोललो. मी त्यांना हे समजावून सांगितलं, आपल्याला नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा करुन घ्यायची आहे. त्यासाठी वेळेत चार्जशीट दाखल होणे आणि केस चालणे, माननीय हायकोर्टाच्या माध्यमातून सगळ्या गोष्टीला फास्ट ट्रॅकवर नेत आहोत. लोकशाहीत आपल्या सगळ्यांना वाटतं, अशा नराधमाला भरचौकात फाशी दिली पाहिजे. पण ते लोकशाहीत करता येत नाही. लोकशाही कायद्याने चालते. पण कोणालाही कायद्याचा दुरुपयोग करता येऊ नये, यादृष्टीने कोणताही कोणतीही पळवाट न ठेवता या नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा कशी होईल, याचा प्रयत्न राज्य सरकार करेल. न्यायालयातून हे प्रकरण वेगाने मार्गी लावले जाईल. तसे पत्र आम्ही पीडीतेच्या कुटुंबाला दिले आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते.

### पुण्यातील नसरापूरमधील नेमकं प्रकरण काय?

सुट्टीसाठी आजीच्या घरी आलेली 4 वर्षांची चिमुकली अंगणात खेळत होती. त्यावेळी 1 मे रोजी 65 वर्षांच्या आरोपीने तिला गोठ्यात नेलं. तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. एवढंच नाहीतर तिला दगडाने ठेचून तिची हत्या केली. त्यानंतर तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली झाकून ठेऊन पळ काढला. इतकं गंभीर कृत्य करूनही या नराधमाला त्याचा जराही पश्चाताप झालेला नाही. ग्रामस्थांनी त्याला चोप देऊन पोलिसांच्या ताब्यात दिलं.

ईडीच्या चौकशीत प्रतिभा चाकणकर यांचा दावा

## धार्मिक कामासाठी दिलेल्या आधार आणि पॅन कार्डचा गैरवापर



मुंबई - रुपाली चाकणकर यांची बहिण प्रतिभा चाकणकर यांची 8 तास ईडीने कसून चौकशी केली. या चौकशीमध्ये धक्कादायक खुलासे झाले. त्यानंतर ईडीने प्रतिभा यांचा मुलगा तनमय चाकणकरला देखील समन्स बजावले आहे. नाशिकमधीस भोंदूबाबा अशोक खरात दिवसेंदिवस चांगलाच अडकत चालला आहे. खरातवर अनेक गंभीर गुन्हे दाखल झाले आहेत. त्यानंतर खरातचे आर्थिक व्यवहार देखील तपासले गेले. दरम्यान, रुपाली चाकणकरांची बहिण प्रतिभा चाकणकर आणि अशोक खरात यांच्यामध्ये 230 कॉल्स झाल्याची माहिती समोर आली. त्यानंतर ईडीने प्रतिभा चाकणकर यांना समन्स बजावले होते. आता प्रतिभा यांनी चौकशीमध्ये खळबळजनक दावा केला आहे. नाशिकमधील समता नागरी सहकारी पतसंस्थेतील संशयास्पद व्यवहार आणि बोगस बँक खात्यांच्या प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ED) आपली पकड घट्ट केली आहे. या तपासादरम्यान प्रतिभा चाकणकर यांची सुमारे ८ तास कसून **(पान 2 वर )**



## अहिल्यानगरकडे निघालेल्या एसटी बसचा कल्याणमधील मुरबाडजवळ अपघात

ठाणे : कल्याण-आहिल्यानगर महामार्गावरील वैशाखरे टोकावडे येथे बस आणि स्कॉर्पिओ कारचा भीषण अपघात झाला असून अपघातात स्कॉर्पिओमधील 4 जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर, 4 प्रवासी गंभीर जखमी आहेत. विठ्ठलवाडी-कल्याण-आहिल्यानगरला जाणारी बस आणि स्कॉर्पीओ गाडीची धडक बसल्याने हा अपघात झाला. विठ्ठलवाडी आगारातून कल्याण-अहिल्यानगरसाठी सकाळी साडेआठ वाजता ही एसटी निघाली होती. मुरबाड तालुक्यातील टोकावडे-वैशाखरे हद्दीत स्कार्पिओ कारसोबत बसची धडक होऊन अपघात झाला. अपघातानंतर स्थानिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्य सुरू केले होते.

■ मुरबाड-माळशेज घाट महामार्गावरील वैशाखरे वळणावर काल मंगळवारी भीषण अपघात घडला. एसटी बस आणि स्कॉर्पिओ कारची समोरासमोर जोरदार धडक होऊन 4 जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात चार जण गंभीर जखमी झाले असून जखमींमध्ये दोन मुलांचा समावेश आहे, त्यांच्यावर जवळच्या सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कल्याणहून अहिल्यानगरच्या दिशेने जाणारी एसटी बस वैशाखरे येथील वळणावर आली असताना समोरुन येणाऱ्या स्कॉर्पिओसोबत तिची जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की, दोन्ही वाहनांच्या पुढील भागाचा चुराडा झाल्याचं व्हिडिओ आणि फोटोंमधून दिसून येते.

■ दरम्यान, प्राथमिक माहितीनुसार, कल्याण-अहिल्यानगर महामार्गावरील वैशाखरे वळणाजवळ ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. याप्रकरणी, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.

# मुंबईकरांच्या प्रवासाचा चेहरामोहरा बदलणाऱ्या नव्या लोकलची आता उत्तर भारतामध्ये चाचणी

**मुंबई - मुंबईकरांच्या प्रवासाचा चेहरामोहरा बदलणारी नवी लोकल आता एका महत्त्वाच्या टप्प्यावर आली आहे. मुंबईच्या रुळांवर धावण्यापूर्वी या स्वयंचलित दरवाजांच्या साध्या लोकलची सध्या उत्तर प्रदेशमध्ये सुरु आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने हा देशातील पहिलाच प्रयोग असून, यामुळे लोकल प्रवासातील अपघात शून्यावर आणण्याचे मोठे उद्दिष्ट रेल्वेने ठेवले आहे.**

### सुरक्षेसाठी महत्त्वाचे बदल

या नव्या लोकलचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची इंटरलॉकिंग सुरक्षा प्रणाली. लोकलचे सर्व दरवाजे पूर्णपणे बंद होत नाहीत, तोपर्यंत ती सुरूच होणार नाही. मुंबईतील गर्दीच्या वेळी **(पान 2 वर )**




### बंद दरवाजांमधील हवेचे गणित

एसी लोकलप्रमाणेच या साध्या लोकलचे दरवाजेही स्वयंचलित स्लायडिंग पद्धतीचे असतील. मात्र, साध्या लोकलमध्ये हवा खेळती राहणे हे सर्वात मोठे आव्हान असते. यासाठी चेन्नईच्या आयसीएफ कारखान्यात तयार करण्यात आलेल्या या रेकमध्ये व्हेंटिलेशनची विशेष सोय करण्यात आली आहे. छतावरील ब्लोअर्सद्वारे मिळणारी फोर्ड व्हेंटिलेशन सिस्टिम, खास डिझाइन केलेले लूव्हर दरवाजे आणि मोठ्या खिडक्या यांमधून प्रवाशांना गुदमरल्यासारखे वाटणार नाही ना, याची कसून चाचणी सध्या सुरू आहे.

### उत्तर भारतामध्ये चाचणी का?

मुंबई उपनगरी रेल्वे मार्गावर चोवीस तास गाड्यांची प्रचंड वर्दळ असते. अशा गजबजलेल्या मार्गावर नव्या तंत्रज्ञानाची सखोल चाचणी करणे रेल्वे प्रशासनासाठी मोठे आव्हान होते. रात्रीच्या मर्यादित वेळेत सर्व तांत्रिक बाबी तपासून पाहणे कठीण जात असल्याने,

रेल्वेने या लोकलचा दुसरा रेक थेट झाशी विभागातील खजुराहो-महोबा या 63.27 किलोमीटरच्या मार्गावर पाठवला आहे. हा मार्ग तुलनेने कमी वाहतुकीचा असल्याने तिथे तांत्रिक निरीक्षणे विनाअडथळा नोंदवणे शक्य होत आहे

### पावसाळ्याची पूर्वतयारी

मुंबईचा पाऊस लक्षात घेता या लोकलमध्ये अँटी-वॉटर इन्ग्रेस प्रणाली देण्यात आली आहे. मुसळधार पावसात रेल्वे रुळांवर पाणी साचले तरी **(पान 2 वर )**

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com


**तापमान**

कमाल ३७° से | किमान २७° से

**बाजार**

| सोने | चांदी |
| --- | --- |
| १,५३,७१० | २,६०,००० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



तुम्हाला चांगले आरोग्य हवे ना ? मग मनातली इव्हीएमचा विषय काढू नका. त्यामुळे तुमची तब्येत व्यवस्थित होईल.

**थोडक्यात घडामोडी**

### रायगड राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष नॉट रिचेबल

पाच राज्याचा निकाल नुकताच लागला आहे. यात काँग्रेसच्या अपयशावरुन भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला आहे. ९९ पराभवांचा टप्पा पार करून "शतकाच्या उंबरठ्यावर" पोहोचलेल्या राहुल गांधी यांचे खास अभिनंदन! आता फक्त एका पराभवाची गरज!... आणि, इतिहास रचला जाईल, असा टोला त्यांनी लगावला आहे.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे हे दोन दिवसांपासुन नॉट रिचेबल असल्याने कर्जत मतदार संघात कार्यकर्त्यांध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. राष्ट्रवादी पक्षातील सुरू असलेल्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर या घटनेकडे गंभीरतेने पाहिलं जात आहे. कर्जत खालापूर मतदार संघातील एका पक्षप्रवेश सोहळ्यातही घारे यांची नाराजगी दिसून आली होती. त्यामुळे त्यांच्या नॉट रिचेबल होण्यामागे नेमकं कारण काय, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.




### गोकुळवर अखेर प्रशासकाची नियुक्ती

कोल्हापुरातील गोकुळ दूध संघावर अखेर प्रशासक मंडळ नियुक्त करण्यात आले आहे. साताऱ्याचे जिल्हा उपनिबंधक संजय कुमार सुद्रिक यांची गोकुळ प्रशासक मंडळाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गोकुळ दूध संघाच्या विद्यमान संचालक मंडळाची आज मुदत संपत आहे. मुदत संपताच प्रशासनाकडून प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यातील राजकारण वातावरण तापलं -** गोकुळ प्रशासक नियुक्ती वरुन गेल्या 15 दिवसापासून कोल्हापूर जिल्ह्यातील राजकारण वातावरण चांगलच तापलं आहे. गोकुळवर प्रशासक नियुक्त होऊ नये यासाठी मंत्री हसन मुश्रीफ प्रयत्नशील होते. मात्र, अखेर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

**गोकुळवर प्रथमच प्रशासकाची नियुक्ती**

दरम्यान, दूध उत्पादकांना न्याय देण्यासाठी 16 मार्च 1963 ला गोकुळ दूध संघाची स्थापना झाली. गेल्या 63 वर्षात संघ जिल्ह्याच्या अर्थकारणाचे केंद्रबिंदू बनला. जिल्ह्याची शिखर संस्था केडीसीसी बँकेवर आतापर्यंत दोन वेळा प्रशासक आले, पण गोकुळवर प्रथमच प्रशासक येत असल्याने संघाशी जोडलेल्या सर्वच घटकांमध्ये **(पान 2 वर )**



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## आव्हान थंडावले

केंद्रातील महाकाय भाजप सकारच्या विरोधात निर्धाराने लढणाऱ्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी तर तमिळनाचे मुख्यमंत्री एम. स्टॅलिन यांच्या विधानसभा निवडणुकीतील पराभवाने विरोधकांच्या इंडिया आघाडीला मोठा फटका बसला आहे. विशेष बाब ही की, पाच राज्यांमध्ये भाजपा अग्रेसर आहे. म्हणजेच तीन राज्यांत भाजपा सत्ता स्थापन करणार आहे. यामागे भाजपची मोठी तपश्चर्या आहे आणि त्यांनी राबविलेली निवडणूक रणनीती आहे. विरोधक भाजपाच्या निवडणूक रणनीतीपासून कोसो मिल दूर आहेत.

विरोधकांपैकी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी व तमिळनाचे मुख्यमंत्री एम. स्टॅलिन यांच्या विधानसभा निवडणुकीत हे दोन्ही नेते पराभूत झाले आहेत. या धक्क्यातून ते सावरलेले नाहीत. मात्र, ममता बॅनर्जी यांनी मुख्यमन्त्रीयदाचा राजीनामा देण्यास नकार दिला आहे. त्यांच्या मते, भाजपने निवडणूक आयोग आणि सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून तृणमूलचा पराभव केला. या पराभवाने आगामी लोकसभा निवडणुकीत दोन्ही राज्यांमधील राजकीय समीकरणे बदलू शकतात. आता इंडिया आघाडी सक्रीय केव्हा होते, याची वाट पाहणे अनेकांनी सोडून दिले आहे. विरोधकच गलितगात्र झाले तर कोण कुणाला कसे सावरणार ?

भाजपा विरोधी आघाडीत म्हणजे इंडिया आघाडीत काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक व समाजवादी पार्टी हे मुख्य पक्ष आहेत. ममता बॅनर्जी यांच्यामुळे पश्चिम बंगाल तर स्टॅलिन यांच्यामुळे तमिळनाडूत विरोधकांच्या आघाडीला बळ मिळाले होते. ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसशी आघाडी करण्याचे टाळले. काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात बंगालमध्ये कधीही एकमत झालेले दिसले नाही. दुसरीकडे बलाढ्य शत्रू उभा टाकलेला असताना आपापला वैयक्तिक इगो बाळगण्यात काय अर्थ ? गत महिन्यात घटना दुरुस्ती विधेयकाच्या विरोधात काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पार्टीने एकत्रित मतदान केले होते. पश्चिम बंगालमधील एसआरएच्या नावाखाली जे मतदार मतदार यादीतून रद्द झाले किंवा रद्द करण्यात आले , त्यांच्याशी विरोधकांच्या पराभवाचा नक्कीच संबंध असावा.

ममता बॅनर्जी व स्टॅलिन यांच्या पराभवाने विरोधी आघाडीला मोठा धक्का बसला आहे. पश्चिम बंगालमध्ये लोकसभेच्या ४२ तर तमिळनाडूत ३९ जागा आहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीत तमिळनाडूतल्या सर्व ३९ जागा द्रमुक-काँग्रेस व अन्य छोट्या पक्षांच्या आघाडीने जिंकल्या आहेत. पश्चिम बंगालमधील ४२ पैकी २९ जागा ममता यांच्या तृणमूलने तर एक जागा काँग्रेसने जिंकली होती. म्हणजेच दोन्ही राज्यांमधील एकूण ८१ पैकी ६९ जागा या विरोधी आघाडीने जिंकल्या होत्या. आगामी लोकसभा निवडणुकीत हाच कल कायम राहण्याबाबत साशंकता वाटते. भाजपा आता सत्ता हातात आल्यावर नेमकी कोणती धोरणे आखणार यावर ते अवलंबून आहे. लोकसभा निवडणुक अद्याप तीन वर्षे लांबणीवर आहे. पश्चिम बंगालमध्ये भाजप या काळात तृणमूल काँग्रेसचे खच्चीकरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. पक्षात फूट पाडून तृणमूलची ताकद असलेल्या भागांमध्ये भाजपच्या वाढीसाठी प्रयत्न केले जातील. तमिळनाडूतही सत्ताधारी टीव्हीकेचा कारभार कसा असेल यावर सारे अवलंबून असेल. पण भाजप भविष्यातील राजकीय रणनीतीसाठी म्हणून मुख्यमंत्री विजय यांना जवळ करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

केंद्रातील भाजपला आव्हान देण्याचे धैर्य ममता बॅनर्जी व स्टॅलिन यांनी दाखविले होते. दोघांनीही भाजपला आव्हान दिले होते. यातूनच केंद्रातील भाजपने दोघांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला होता. ममता बॅनर्जी व भाजपमध्ये सतत संघर्ष सुरू होता. ममता बॅनर्जी यांची कोंडी करण्याची भाजपकडून एकही संधी सोडली जात नसे. त्यासाठी राजभवनाचाही खुबीने वापर करण्यात आला होता. ममता बॅनर्जी यांनी राज्यपालांनाही त्यांची जागा दाखवून दिली होती. आर. जी. कार रुग्णालयातील महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली होती. या मुद्दयाचा प्रभावी वापर भाजपाने केला. ममता बॅनर्जी यांना बचावात्मक भूमिका घ्यावी लागली होती. भाजपने या प्रकरणातील पीडितेच्या आईलाच उमेदवारी देऊन ममता बनर्जेंची कोंडी केली होती.

२०१९ मधील लोकसभा निवडणुकीतील यशाने भाजपची ताकद वाढली होती. पण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांनी भाजपला धोबीपछाड केले होते. भाजपने गेली दोन वर्षे मेहनत घेत निवडणुकीची व्यूहरचना केली. तृणमूलच्या पराभवाने तृणमूल काँग्रेस एकसंघ ठेवण्याचे मोठे आव्हान ममता बॅनर्जीसमोर असेल. ममता बॅनर्जी यांच्याप्रमाणेच तमिळनाडूत मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी भाजपशी कायम संघर्ष केला. अगदी प्रचाराच्या काळात महिला आरक्षण विधेयक काळे कपडे घालून जाळत निषेध व्यक्त केला होता. विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांना राज्यपालांनी संमती देण्याचे नाकारल्याच्या मुद्द्यावर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात लढा दिला. हिंदी लादण्याचा आरोप करीत केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यास स्टॅलिन यांनी नकार दिला होता. त्यासाठी केंद्राने दोन हजार कोटींचा निधी अडविला होता. हिंदी सक्तीवरून त्यांनी भाजपच्या विरोधात ठोस भूमिका घेतली होती. ममता बॅनर्जी यांच्याप्रमाणेच भाजपला त्यांनी आव्हान दिले होते. पण विधानसभा निवडणुकीतील पराभवाने स्टॅलिन यांचाही आवाज बंद झाला आहे. आता स्थानिक सरकार काय भूमिका घेणार, त्यावर तामिळनाडूचे भवितव्य असेल.

आगामी वर्षी उत्तर प्रदेशमध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे. लोकसभेच्या ८० जागा असलेल्या या राज्यात लोकसभा निवडणुकीत भाजपला मोठा फटका बसला. समाजवादी पार्टीचे ३७ व काँग्रेसचे सहा असे एकूण ४३ खासदार निवडून आले. याउलट २०१४ व २०१९ मध्ये एकहाती कौल मिळालेल्या भाजपचे ३३ खासदार निवडून आले. उत्तर प्रदेशातील पराभवाने भाजपचे संख्याबळ २४० खासदारांवर आले. उत्तर प्रदेशात आगामी वर्षी निवडणुकीच्या रणांगणावर काय होणार ? सत्ता मिळणार की सत्ता जाणार ? हे पाहिले पाहिजे. भाजपचे उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ सावध झाले आहेत. त्यांनी राज्यातील राजकीय वातावरण बदलण्यावर भर दिला आहे. मतदारयाद्यांच्या सखोल विशेष फेरतपासणी मोहिमेत उत्तर प्रदेशातील सुमारे दोन कोटी नावे वगळण्यात आली आहेत. पश्चिम बंगालमध्ये ९१ लाख नावे वगळण्यात आली होती. त्याचा भाजपला मोठा फायदा झाला. उत्तर प्रदेशातही मतदारांची नावे अशीच वगळणार का ?  हे पाहिले पाहिजे. केरळाचा गड राहुल गांधींनी राखला आहे. पण तिथे डाव्यांचा पराभव झाला. भाजपने निवडणुकीत साम, दाम , दंड भेद अशी शक्ती वापरली. यापुढेही भाजपची हीच भूमिका राहण्याची शक्यता आहे.

## मुलींच्या लग्नासाठी सोनं, विद्यार्थ्यांना 15 हजार, शेतकऱ्यांचं सगळं कर्ज माफ

## विजय थलपतीने 7 आश्वासनांनी तामिळनाडूच्या राजकारणाचा डीएनएच बदलला

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत विजय थलपति यांच्या टीव्हीके पक्षाने 107 जागा जिंकत नवा इतिहास घडवला. टीव्हीकेने तामिळनाडूच्या राजकारणातील प्रस्थापित असलेल्या द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांना मोठा धक्का दिला आहे. या निवडणुकीत थलपति यांच्या टीव्हीके पक्षाने सामान्य जनतेला सात महत्त्वाची आश्वासनं दिली होती.

■ विजय थलपतिने दिलेलं पहिलं आश्वासन म्हणजे 60 वर्षांपर्यंत घरातील कुटुंबप्रमुख महिलेला महिन्याला अडीच हजार रुपये मिळणार
■ प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी सहा एलपीजी सिलेंडर मोफत मिळणार
■ मुलींच्या लग्नासाठी आठ ग्रॅम सोने देणार
■ पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी 15 हजार रुपये मिळणार
■ सरकारी बसमध्ये महिलांना मोफत प्रवास
■ बेरोजगार युवकांना महिन्याला 4000 रुपये भत्ता मिळणार
■ तामिळनाडूत 5 एकरपर्यंत जमीन असलेल्या शेतकऱ्यांचे पूर्ण कर्ज माफ होणार. उर्वरित शेतकऱ्यांचे 50 टक्के कर्ज माफ केले जाणार.



## पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्रीपद कुणाला?

**(पान 1 वरून )** करणारे सुवेंदू अधिकारी हे बंगालचे पुढील मुख्यमंत्री होऊ शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. ९ मे हा रवींद्रनाथ टागोर यांचा जयंती दिवस आहे. भाजप अध्यक्षांच्या मते, त्या दिवशीच बंगालचे नवे मुख्यमंत्री शपथ घेतील. भाजप नेते आणि बंगाल पक्षाध्यक्ष सामिक भट्टाचार्य यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना ही माहिती दिली आहे.

दरम्यान पश्चिम बंगालमध्ये भाजप पहिल्यांदाच सरकार स्थापन करणार आहे. बंगालमधील विजयानंतरच्या भाषणात पंतप्रधान मोदींनी रवींद्रनाथ टागोर यांचा उल्लेख केला. गुरुदेव टागोर यांच्या अजरामर ओळींमधील भावना व्यक्त करताना ते म्हणाले की, "जिथे मन भीतीमुक्त असेल आणि मान ताठ असेल" असा बंगाल घडवण्याचा भाजपचा संकल्प आहे. विजयानंतर पंतप्रधान मोदींनी भाजप कार्यालयाला भेट दिली.

## धार्मिक कामासाठी दिलेल्या  आधार आणि पॅन कार्डचा गैरवापर

**(पान 1 वरून )** चौकशी करण्यात आली असून या चौकशीत त्यांनी केलेले दावे आता राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहेत.

**प्रतिभा चाकणकर काय म्हणाल्या? -** चौकशीदरम्यान प्रतिभा चाकणकर यांनी अत्यंत धक्कादायक माहिती दिली आहे. त्यांनी असा दावा केला की, त्यांनी स्वतःचे आणि त्यांचा मुलगा तनमय चाकणकर याचे आधार आणि पॅन कार्डचे तपशील कॅप्टन खरात यांना दिले होते. हे तपशील केवळ धार्मिक कामासाठी वापरले जातील, असे आश्वासन त्यांना खरात यांच्याकडून देण्यात आले होते. मात्र, खरात यांनी या विश्वासाचा गैरवापर करून त्यांच्या कागदपत्रांच्या आधारे बेकायदेशीररीत्या बोगस बँक खाती उघडल्याचा आरोप प्रतिभा चाकणकर यांनी केला आहे.

या प्रकरणातील तपासात काही अत्यंत महत्त्वाचे धागेदोरे ईडीच्या हाती लागले आहेत. २०२५ ते २०२६ या कालावधीत प्रतिभा चाकणकर आणि कॅप्टन खरात यांच्यामध्ये २३० कॉल्स आणि २०० पेक्षा अधिक मेसेजेसची देवाणघेवाण झाल्याची माहिती समोर आली असून, या मोठ्या प्रमाणावरील संवादाची सध्या ईडीकडून सखोल पडताळणी सुरू आहे. विशेष म्हणजे, उघडण्यात आलेल्या या संशयास्पद खात्यांमध्ये कॅप्टन खरात याचे नाव 'नामनिर्देशित' (Nominee) म्हणून नोंदवण्यात आले होते आणि खाते उघडताना खरातचाच मोबाईल नंबर वापरल्याचा प्राथमिक संशय आहे.

आर्थिक व्यवहारांच्या बाबतीतही ईडीला मोठा संशय आहे. २०२१ मध्ये जमा झालेले सुमारे २६ लाख रुपये एका विशेष खात्यात वळवून २०२४ पर्यंत ठेवण्यात आले होते, ज्यावर सुमारे ४० लाख रुपयांचा परतावा मिळाल्याचे तपासात दिसून येत आहे. या आर्थिक नफ्याचे नेमके स्त्रोत काय होते, याचा शोध आता घेतला जात आहे. नाशिकच्या समता नागरी सहकारी पतसंस्थेत प्रतिभा आणि त्यांच्या मुलाच्या नावावर आढळलेली चार खाती ही एकूण १३४ संशयित 'बोगस' खात्यांच्या जाळ्याचा भाग असल्याचा संशय बळावला आहे.

या संपूर्ण प्रकरणात ईडीने आता त्यांचा मुलगा तनमय चाकणकर यालाही समन्स बजावले आहे. प्रतिभा चाकणकर यांची ८ तासांच्या प्रदीर्घ चौकशीनंतर त्या दिवशी सुटका करण्यात आली असली, तरी तपासातील विसंगती आणि नव्याने समोर येणारी माहिती पाहता त्यांना पुन्हा एकदा चौकशीसाठी पाचारण केले जाण्याची शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे. या प्रकरणाचा तपास जसजसा पुढे जाईल, तसतसे आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे.

## सुरक्षेसाठी महत्त्वाचे बदल

**(पान 1 वरून )** प्लॅटफॉर्मवर होणारी धावपळ, प्रवाशांच्या चढण्या-उतरण्याच्या सवयी आणि दरवाजा उघडण्यासाठी लागणारा वेळ या सर्वांचा ताळमेळ या चाचणीत बसवला जात आहे. यामुळे धावत्या लोकलमधून पडण्याच्या अपघातांना लगाम बसणार आहे.

## पावसाळ्याची पूर्वतयारी

**(पान 1 वरून )** डब्यांमध्ये पाणी शिरणार नाही, याची खात्री या चाचणी दरम्यान केली जात आहे. उत्तर प्रदेशातील सर्व टप्प्यांतील चाचण्या यशस्वी झाल्यानंतर हा रेक पुन्हा मुंबईत आणला जाईल. तिथे अंतिम चाचण्या पार पडल्यावर ही लोकल मुंबईकरांच्या सेवेत दाखल करण्याबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

## गोकुळवर अखेर प्रशासकाची नियुक्ती

**(पान 1 वरून )** काहीशी अस्वस्थता आहे. यापूर्वी 'केडीसीसी बैंक, 'बिद्री' व "भोगावती' कारखान्यांवर प्रशासकीय मंडळ आले होते. बँक असो वा साखर कारखाना त्यांचे कामकाज व दूध संघ यांच्यात फरक आहे. गोकुळ दूध संघाची निवडणूक घेण्याआधीच ज्या पद्धतीने आरोप, प्रत्यारोप सुरू आहेत ते पाहता प्रशासकांनीही कामकाज करताना काही प्रश्नांचा सामना करावा लागू शकतो. आव्हान देऊन प्रशासक आणला जात असल्याने साहजिकच 'गोकुळ'च्या राजकीय विश्वात अस्वस्थता अधिक आहे.

# लातूरमध्ये 3 हजारांची लिमिट : पेट्रोल पंपावर गर्दी; शेतकऱ्यांना नांगरटीला अडचणी, बीडमध्येही रांगा

लातूर : जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा (Petrol) तुटवडा निर्माण झाल्यामुळे बहुतांश पेट्रोलपंपांवर आज सकाळपासूनच वाहनधारकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. लातूर (Latur) शहरात इंधन भरण्यासाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, या वाढत्या गर्दीमुळे पंप कर्मचाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडत असल्याचे चित्र आहे. गेल्या दोन दिवसांपासून शहरात इंधनटंचाईची परिस्थिती कायम असून, अनेक पंपांवर साठा मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहे. सलग तीन दिवसांच्या सुट्ट्यांमुळे इंधनाच्या मागणीत अचानक वाढ झाल्याने हा तुटवडा निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. तर, शेतीच्या  कामांनाही याचा फटका बसत आहे. दुसरीकडे बीडमध्येही पेट्रोल-डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे वाहनधारकांच्या पेट्रोल पंपावर रांगा लागल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

एकीकडे राज्यात कुठलाही इंधन तुटवडा नसल्याचे सरकार सांगत असताना दुसरीकडे डिझेल तुटवड्यामुळे ग्रामीण भागात परिस्थिती शहरापेक्षा अधिक बिकट झाली आहे. शेतामध्ये नांगरटीसारखी महत्त्वाची कामे इंधनाअभावी ठप्प झाली आहेत. ट्रॅक्टरसाठी डिझेल मिळत नसल्याने अनेक ट्रॅक्टर एकाच ठिकाणी उभे असल्याचे चित्र दिसत आहे. ट्रॅक्टर चालकांनीही स्पष्ट भूमिका घेतली असून डिझेल आणा, मगच काम करतो असे सांगितल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. ग्रामीण भागातील पेट्रोल पंपांवर शेतकऱ्यांची मोठी गर्दी होत असून, उपलब्ध इंधन मागणीच्या तुलनेत अत्यल्प पडत आहे. या परिस्थितीमुळे शेतीकामांवर मोठा परिणाम होत आहे.

लातूर जिल्ह्यात पानगाव येथील 16 एकर शेती असलेले शेतकरी मयूर चव्हाण यांनी सांगितले की, मागील आठ दिवसांपासून डिझेल टंचाई वाढत चालली आहे. "एका वेळेला तीन हजार रुपयांचेच डिझेल मिळते, त्यात एक एकरही नीट होत नाही. ट्रॅक्टर चालक लाईनला उभे राहत नाहीत. पाच-पाच, सहा-सहा तास रांगेत उभे राहून केवळ तीन हजार रुपयांचे डिझेल मिळत आहे. खत, बियाणे आणि आता डिझेलसाठीही रांगेत उभे राहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे," अशी खंत त्यांनी व्यक्त केली. याचा परिणाम वाहतूक व्यवस्थेवरही होताना दिसत आहे. डेली वाहतूक करणारे छोटा हत्ती, मोठा हत्ती आणि टेम्पो चालकांना इंधनाअभावी अडचणींचा सामना करावा लागत आहे. लातूर-धाराशिव, लातूर-सोलापूर, लातूर-नांदेड या मार्गांवर फळे व भाजीपाला वाहतूक करणाऱ्या वाहनचालक आणि मालकांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.



**पुरवठा विभाग 57 पेट्रोल पंपाची माहिती घेणार-** जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांच्या मते, पेट्रोल-डिझेलचे दर वाढणार असल्याच्या अफवेमुळे नागरिकांनी मोठ्या प्रमाणात एकाच वेळी इंधन खरेदी केली. प्रत्येक पेट्रोल पंपावर साधारणतः तीन दिवस पुरेल इतका साठा असतानाही तो एका दिवसातच संपल्याने पॅनिक परिस्थिती निर्माण झाली. जिल्हा पुरवठा विभागाने लातूर जिल्ह्यातील सर्व 57 पेट्रोल पंपांवरील साठ्याची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली असून, आज संध्याकाळपर्यंत परिस्थितीवर नियंत्रण मिळवून इंधनपुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, इंधनटंचाईमुळे शहरासह ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले असून, प्रशासनाच्या उपाययोजनांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**बीडमध्येही 5 दिवसांपासून इंधन टंचाई -** बीडमध्ये सलग पाच दिवसांपासून इंधनाचा पुरवठा पूर्णपणे विस्कळीत आहे. इंधनाची गाडी पेट्रोल पंपावर दाखल होताच वाहनधारकांच्या मोठ्या रांगा पेट्रोल पंपावर लागत आहेत. भर उन्हात दुचाकी स्वारांसह रिक्षा चालकांची मोठी गर्दी पेट्रोल पंपावर दिसून येतेय. जिल्ह्यातील पेट्रोल पंपावर इंधनाचा पुरवठा सुरळीत व्हावा. या अनुषंगाने कालच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या दालनात पेट्रोल पंप चालकांची बैठक पार पडली. मात्र, इंधनाची टंचाई अद्याप तरी दूर झालेली नाही. सलग पाच दिवसांपासून ही परिस्थिती बीडमध्ये पाहायला मिळते.

## राक्षसी वृत्तीचा कारभार, फडणवीसांचं सरकार आपटावंच लागेल; जरांगे पाटलांचा हल्लाबोल, बंगालच्या निकालावरही संशय

सोलापूर : देशातील 5 राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल लागले असून भाजपने (BJP) तीन राज्यात स्पष्ट बहुमताने सरकार स्थापन होईल, एवढे संख्याबळ मिळवले आहे. अवघ्या देशाचं लक्ष लागलेल्या पश्चिम बंगालमध्येही भाजपने द्विशतक ठोकत ममता दीदींच्या 15 वर्षांच्या सत्तेला सुरुंग लगावला आहे. भाजपने मोठ्या फरकाने बंगालमध्ये (West bengal) एकहाती सत्ता मिळवल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. तर, विरोधकांनी देखील भाजपच्या विजयावर एसआरए आणि ईडी, सीबीआयसारख्या संस्थांचा वापर करुन मतचोरी केल्याचं म्हटलं आहे. आता, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील (Manoj jarange patil) यांनीही भाजपच्या विजयावर शंका उपस्थित केली आहे. तसेच, राज्यातील वाढत्या गुन्हेगारीवरूनही संताप व्यक्त करत, फडणवीसांचे सरकार आपटावेच लागेल, असेही म्हटले.

अकलूज येथील सकल मराठा मोर्चाचे समन्वयक धनाजी साखळकर यांच्या आईच्या मृत्यूनंतर जरांगे पाटील यांनी रात्री त्यांच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट घेतली. त्यानंतर कार्यकर्त्यांशी बोलताना फडणवीस सरकारवर जोरदार निशाणा साधला. सध्या राज्यात वाढलेल्या गुन्हेगारीबाबत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधताना हे असले रत्न आपल्याला लाभले आहेत, हे गुंडांना जेलमध्ये एसी लावून देतात आणि मोबाईल फोन देतात. यांच्या काळात गुंडांचे चालणार आहे. फडणवीसांचे सरकार राक्षसी वृत्तीचे असून आता ते आपटावेच लागेल, असे म्हणत जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

ज्याला विचारले ते म्हणतो मी यांना मतदान केले नाही, तरी हे जिंकतात. पश्चिम बंगालमध्ये ममता बाईला पाडले, पण लोक म्हणतात ममताबाई कधीच पडणार नाही. मला पहिल्यांदा वाटायचं काही नसेल पण आता नक्की काहीतरी भानगड आहे, त्यांनी कुठेतरी काड्या खोचून ठेवल्या आहेत, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी भाजपच्या पश्चिम बंगाल आणि इतर राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या विजयानंतर प्रतिक्रिया दिली. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भाजपाच्या विजयानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी, तृणमूलच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी भाजपवर जोरदार टीका केली होती. आता, मनोज जरांगे पाटील यांनीही भाजपच्या विजयावर शंका घेतली आहे.

Public Trusts Registration Office, Palghar
Address: Palghar region, Palghar, 2 nd floor, Administrative Office "B" Govt. Offices Complex, Boisar Road, Kolgaon Palghar, Palghar.

**Public Notice**

Service Request Number : PLG/00959/18/26
Inquiry/case No. :  . **ACC/58/2026**
Name of the Trust :   **GODAVARI  FRIENDS PRERNA  TRUST**
**Address of the Trust : C/o SANJEEBKUMAR  ANDRAP A-301, PATEL PALACE,  NEAR BANK OF BARODA, PALGHAR, DAHANU**
**Registration Number of the Trust (if)** : GODAVARI  FRIENDS PRERNA  TRUST
**Name of the Applicant :** SANJEEBKUMAR  ANDRAP

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Palghar Region, Palghar
1. Whether  a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash | |

**Value of Movable Property :** Rs.  Only
(In Words Rs. ....Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property :  Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 30/04/2026.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Palghar

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान
जाहीर सुचना

राज्य अभियान संचालक, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांनी दिलेल्या निर्देशानुसार खालीलप्रमाणे सूचना जाहीर करण्यात येत आहेत. ठाणे शहरातील जनतेला कळविण्यात येते की,  केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचना क्र.जीएसआर-३२० (इ) दिनांक १८/०३/२०१६ अन्वये प्लॉस्टीक वेस्ट मॅनजमेंट रूल्स – २०१६ लागू केलेले आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने अधिसूचना क्रमांक प्लॅस्टिक – २०१८/प्र.क्र. २४/ तां. क्र.४ २२ २०१७  दि. एप्रिल २३ मार्च, २०१८ व दिनांक २ जुलै, २०१८ नुसार अविघटनशील कचऱ्यामुळे स्वच्छ भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे "महाराष्ट्र प्लॉस्टीक व थर्मोकोल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर विक्री, वाहतुक, हाताळणी, साठवणूक व तद्नंतर वेळोवेळी केलेल्या सुधारणा) अधिसूचना, २०१८ संपूर्ण राज्यासठी लागू करण्यात आली आहे.""Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage)" Notification २०१८."प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम, 2022 – दिनांक 6 जुलै, 2022 "नुसार  "उत्पादक, आयातदार आणि ब्रँड मालक यांनी प्लास्टिक पॅकेजिंगसाठी अनुसूची-II मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार विस्तारित उत्पादक जबाबदारी (Extended Producers Responsibility) पूर्ण करावी." सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, उपरोक्त नियम व अधिसूचनेची कठोर अंमलबजावणी ठाणे शहारांमध्ये सुरू करण्यात आलेली आहे. यातील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास नियताप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ठामपा/पिआरओ/घ.क.व्य/१११/२०२६-२७ — सही/-
दि:०५.०५.२०२६ — अतिरिक्त आयुक्त (२)
Pls visit our official web-site — ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

सिडको
शहरांचे शिल्पकार

**शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित**
**उद्यान विभाग**

शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको लि.) च्या हद्दीतील खाली नमूद केल्याप्रमाणे मे. कनाकिया स्पेसेस रिअल्टी प्रा. लि. यांनी भूखंडाच्या विकास कामात बाधित होणारी झाडे काढण्यास (पुनर्रोपण/तोडणे) रीतसर परवानगी मागितली आहे.

| अ.क्र. | झाडे तोडावयाचे ठिकाण | अर्जदाराचे नाव | बाधित होणारी झाडे |
|---|---|---|---|
| १. | अंतिम भूखंड क्र. १२०, टीपीएस–२, मौजे भोकरपाडा (चिपले), ता. पनवेल, जि. रायगड. | मे. कनाकिया स्पेसेस रिअल्टी प्रा. लि., विल्को सेंटर, तळमजला, सुभाष रोड, ऑप. गरवारे, विलेपार्ले (पूर्व), मुंबई– ४०००५७ | २१२ |
| | | **एकूण** | **२१२** |

सदर भूखंडाच्या विकास कामात (प्रस्तावित इमारत बांधकाम प्रकल्प) बाधित होणारी झाडे काढण्यास (पुनर्रोपण/तोडणे) परवानगी देणे अगोदर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये हरकती मागविण्यांत येत आहेत. तरी कोणाच्या काही हरकती असल्यास ७ दिवसांच्या आत उद्यान विभाग, सिडको लि., ८ वा मजला, रायगड भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे लेखी स्वरुपात देण्यांत याव्यात. मुदतीत हरकत न आल्यास झाडे काढण्यास (पुनर्रोपण/तोडणे) वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**वृक्ष अधिकारी, सिडको लि.**
सिडको/जनसंपर्क/०५७/२०२६–२७
CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**




## भारतीय रिझर्व्ह बँक

■ पदाचे नाव & तपशील:
1 ज्युनियर इंजिनिअर (Civil)
2 ज्युनियर इंजिनिअर (Electrical)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: 65% गुणांसह सिव्हिल इंजिनिअरिंग डिप्लोमा (SC/ST/PwBD: 55% गुण) + 02 वर्षे अनुभव किंवा 55% गुणांसह सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी (SC/ST/PwBD: 45% गुण) + 01 वर्ष अनुभव
पद क्र.2: 65% गुणांसह इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा (SC/ST/PwBD: 55% गुण) + 02 वर्षे अनुभव किंवा 55% गुणांसह इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी (SC/ST/PwBD: 45% गुण) + 01 वर्ष अनुभव
■ वयाची अट: 01 एप्रिल 2026 रोजी 20 ते 30 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ Fee: General/OBC/EWS: ₹450+18% GST/- [SC/ST/PWD: ₹50+18% GST/-]
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: 06 मे 2026
■ परीक्षा: 06 जून 2026
■ अधिकृत वेबसाइट https://m.rbi.org.in//hindi/home.aspx

## भारत पेट्रोलियम

■ पदाचे नाव & तपशील:
1 ज्युनियर एक्झिक्युटिव्ह (Engineering)
2 ज्युनियर एक्झिक्युटिव्ह (Accounts)
3 ज्युनियर एक्झिक्युटिव्ह (Wayside Amenities)
4 सेक्रेटरी BPCL
5 असोसिएट एक्झिक्युटिव्ह (Quality Assurance)
6 असोसिएट एक्झिक्युटिव्ह (Official Language Implementation)
■ शैक्षणिक पात्रता: [Gen/OBC: 60% गुण, SC/ST/PWD: 55% गुण]
पद क्र.1: (i) इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Instrumentation / Electronics/ Civil/ Chemical)
पद क्र.2: (i) पदवीधर (ii) Inter CA/ Inter CMA (iii) 05 वर्षे अनुभव
पद क्र.3: (i) B.Com/BBA /B.Sc / BMS / BHM (ii) 05 वर्षे अनुभव
पद क्र.4: (i) पदवीधर (ii) 05 वर्षे अनुभव
पद क्र.5: (i) M.Sc (Chemistry) (ii) 03 वर्षे अनुभव
पद क्र.6: (i) हिंदीमध्ये पदव्युत्तर पदवी (ii) 03 वर्षे अनुभव
■ वयाची अट: 01 एप्रिल 2026 रोजी, [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
पद क्र.1: 32 वर्षांपर्यंत
पद क्र.2: 30 ते 35 वर्षे
पद क्र.3: 32 वर्षांपर्यंत
पद क्र.4: 32 वर्षांपर्यंत
पद क्र.6: 35 वर्षांपर्यंत
पद क्र.6: 35 वर्षांपर्यंत
■ Fee: General/OBC/EWS: ₹1180/- [SC/ST/PWD: फी नाही]
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: 17 मे 2026
■ अधिकृत संकेतस्थळ- https://www.bharatpetroleum.in/index

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ पदाचे नाव & तपशील:
1 स्टेनोग्राफर, ग्रेड 'C' (ग्रुप 'B') 731
2 स्टेनोग्राफर, ग्रेड 'D' (ग्रुप 'C')
■ शैक्षणिक पात्रता: (i) 12वी उत्तीर्ण. (ii) लघुलेखन कौशल्य अनिवार्य
■ वयाची अट: 01 ऑगस्ट 2026 रोजी, [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
पद क्र.1: 18 ते 30 वर्षे
पद क्र.2: 18 ते 27 वर्षे
■ Fee: General/OBC: ₹100/- [SC/ST/PWD/ExSM/महिला: फी नाही]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online

महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 15 मे 2026 (11:00 PM)
■ अर्ज दुरुस्ती: 20 ते 21 मे 2026
■ अधिकृत संकेतस्थळ https://ssc.gov.in/

## SSC मार्फत हिंदी ट्रान्सलेटर

■ पदाचे नाव & तपशील:
1 ज्युनियर ट्रान्सलेशन ऑफिसर (JTO) 84
2 ज्युनियर ट्रान्सलेशन ऑफिसर (AFHQ)
3 ज्युनियर हिंदी ट्रान्सलेटर (JHT) / ज्युनियर ट्रान्सलेशन ऑफिसर (JTO) /ज्युनियर ट्रान्सलेटर (JT)
4 सिनियर हिंदी ट्रान्सलेटर (SHT) / सिनियर ट्रान्सलेटर (ST)/सिनियर ट्रान्सलेशन ऑफिसर (STO)
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.1, 2, 3: (i) इंग्रजी विषयासह हिंदी पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य (ii) हिंदी/इंग्रजी अनुवादात डिप्लोमा/प्रमाणपत्र किंवा 02 वर्षे अनुभव.
पद क्र.4: (i) इंग्रजी विषयासह हिंदी पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य (ii) हिंदी/इंग्रजी अनुवादात डिप्लोमा/प्रमाणपत्र किंवा 03 वर्षे अनुभव.
■ वयाची अट: 01 ऑगस्ट 2026 रोजी 18 ते 30 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹100/- [SC/ST/ExSM/महिला: फी नाही]
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 14 मे 2026 (11:00 PM)
■ अर्ज दुरुस्ती: 19 ते 20 मे 2026
■ संकेतस्थळ https://ssc.gov.in/

## केंद्रीय राखीव पोलीस दल

■ पदाचे नाव & तपशील:
1 कॉन्स्टेबल (ट्रेड्समन & टेक्निकल) 9175
2 कॉन्स्टेबल (पायोनियर विंग) 20
■ शैक्षणिक पात्रता: कॉन्स्टेबल (ड्रायव्हर): (i) 10वी उत्तीर्ण (ii) अवजड वाहन चालक परवाना
कॉन्स्टेबल (मेकॅनिक मोटर व्हेईकल): (i) 10वी उत्तीर्ण (ii) ITI (मेकॅनिक मोटर व्हेईकल) (iii) 01 वर्ष अनुभव
कॉन्स्टेबल (पायोनियर विंग): (i) 10वी उत्तीर्ण (ii) मेसनरी किंवा इलेक्ट्रिशियन ट्रेड मध्ये 01 वर्ष अनुभव
उर्वरित ट्रेड: 10वी उत्तीर्ण
शारीरिक पात्रता: प्रवर्ग उंची छाती
पुरुष महिला पुरुष
General/OBC 170 सें.मी. 157 सें.मी. 80 सें.मी. व फुगवून 5 सें.मी. जास्त
ST 162.5 सें.मी. 150 सें.मी. 76 सें.मी. व फुगवून 5 सें.मी. जास्त
वयाची अट: 01 जानेवारी 2026 रोजी, [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
कॉन्स्टेबल (ड्रायव्हर): 21 ते 27 वर्षे
उर्वरित ट्रेड: 18 ते 23 वर्षे
■ Fee: General/OBC/EWS: ₹100/- [SC/ST/ExSM/महिला: फी नाही]
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 19 मे 2026
■ संकेतस्थळ https://crpf.gov.in/

## युनियन बँक ऑफ इंडिया

■ पदाचे नाव & तपशील:
1 अप्रेंटिस 1865
■ शैक्षणिक पात्रता: पदवीधर
वयाची अट: 01 एप्रिल 2026 रोजी 20 ते 28 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: ₹944/- [SC/ST/PWD: ₹236/-, महिला: ₹708/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 19 मे 2026
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाइट https://www.unionbankofindia.bank.in/en/home

## आदिवासी विकास विभाग

■ पदाचे नाव & तपशील:
1 चौकीदार (Watchman) 416
■ शैक्षणिक पात्रता: 10वी उत्तीर्ण
वयाची अट: 01 एप्रिल 2026 रोजी 18 ते 38 वर्षे [मागासवर्गीय: 05 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ Fee: अमागास: ₹1000/- [मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ/दिव्यांग:₹900/-, माजी सैनिक: फी नाही]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 18 मे 2026 (11:55 PM)
■ अधिकृत वेबसाइट
https://tribal.maharashtra.gov.in/1001/%e0%a4%ae%e0%a5%81%e0%a4%96%e0%a5%8d%e0%a4%af-%e0%a4%aa%e0%a5%83%e0%a4%b7%e0%a5%8d%e0%a4%a0

## राष्ट्रीय पात्रता चाचणी (नेट)

■ पदाचे नाव & तपशील:
1 JRF & सहायक प्राध्यापक —
शैक्षणिक पात्रता: 55% गुणांसह मास्टर पदवी /पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य [SC/ST/OBC/PWD/Transgender: 50% गुण]
■ वयाची अट: 01 जून 2026 रोजी, [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
JRF: 30 वर्षांपर्यंत.
सहायक प्राध्यापक: वयाची अट नाही.
■ Fee: General: ₹1150/-, [OBC/EWS: ₹600/-, SC/ST/PWD: ₹325/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 20 मे 2026
■ प्रवेशपत्र: 15 जून 2026
■ परीक्षा: 22 ते 30 जून 2026
■ अधिकृत वेबसाइट
https://ugcnet.nta.ac.in/

# प्लास्टिकचे टिफीन, बाटल्या, प्लेट्स वापरणे टाळा

प्लास्टीक हे टिकाऊ असल्याबरोबरच तांबे,पितळ,स्टील, अल्युनिमियम या धातूंच्या तुलनेत स्वस्त आणि परवडणारे आहे. शिवाय दैनंदिन जीवनात वापरात येणाऱ्या इतर धातुंच्या वस्तूंच्या तुलनेत प्लास्टीकच्या वस्तू सहज कुठेही आणि कधीही उपलब्ध आहेत. तसेच धुवायला सोप्या आणि दिसायला आकर्षक असल्यामुळे आपल्याकडे प्रत्येक किचनमध्ये प्लास्टिकच्या वस्तू दिसतात. यात प्रामुख्याने डाळी, कडधान्य, सुका खाऊ यासारखे खाण्याचे पदार्थ ठेवण्यासाठी प्लास्टीकच्या डब्याचा उपयोग आपण करतो. एवढंच नाही तर सहज धुता येत असल्याने प्लास्टीकच्या बाटल्या, प्लेट, ग्लास, चमचे, काटे, चाकू, कटर, सुऱ्या, टिफीन, पिशव्या, ही प्लास्टीकचेच वापरतो. वापरायला सोयीस्कर असल्याने आपल्या जीवनात प्लास्टिकचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. खाण्यापासून ते पेयापर्यंतच्या बहुतांश गोष्टींसाठी आपण प्लास्टिकच्या वस्तू वापरतोय. मुलांना दुपारचे जेवण प्लास्टिकच्या बॉक्समध्ये दिले जाते आणि फ्रीजमधील प्लास्टिकच्या बॉक्समध्ये अन्न साठवले जाते. पण तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार प्लास्टीक स्लो पॉयझन असून प्लास्टिक अन्नाच्या संपर्कात आल्यावर त्याचे गंभीर परिणाम आरोग्यावर होतात. कारण जेव्हा गरम किंवा चरबीयुक्त ,पदार्थ प्लास्टीकच्या संपकार्त येतो त्यावेळी त्यातील घातक रसायनही पदार्थात मिसळतात. प्लास्टिकच्या वस्तूमध्ये पीईटीई, ज्याला पॉलिथिलीन टेरेफ्थालेट असे म्हणतात वापरले जाते. जे प्रामुख्याने एकदाच वापरण्यासाठी सुरक्षित मानले जाते. पण हे प्लास्टिक आपण वारंवार वापरतो. त्यात जेवण गरमही करतो. जे आरोग्यासाठी घातक आहे. यामुळे प्लास्टीकच्या डब्याचा वापर जेवणासाठी करणे टाळावे. त्याऐवजी वेगळ्या प्रकारच्या वस्तूंचा वापर करण्याचा सल्ला तज्ज्ञमंडळी देत आहेत.

प्लास्टिकच्या डब्यांमध्ये अन्न साठवणे ही सामान्य बाब आहे मात्र त्यात अन्न गरम करून खाणे किंवा गरम पदार्थ टाकून खाणे अयोग्य आहे. त्यामुळे प्लास्टीक बनवण्यासाठी वापरण्यात आलेले पदार्थ अन्नामध्ये जाऊ शकतात. त्यामुळे गरम, तेलकट आणि आम्लयुक्त पदार्थ प्लास्टिकच्या डब्यात कधीही साठवू नये.

प्लास्टिकला पर्याय

तज्ञांच्या मते, प्लॅस्टिक व्यतिरिक्त, आपण अन्न साठवण्यासाठी वापरू शकता ते कंटेनर काच, स्टेनलेस स्टील, सिलिकॉन, मेण आणि बांबूपासून बनलेले कंटेनर आहेत. या सर्व कंटेनरमध्ये विषारी पदार्थ नसतात. या डब्यांमध्ये तुम्ही तुमचे अन्न सहज सुरक्षित ठेवू शकता. प्लास्टिक डबे खरेदी करताना त्याच्या जाडीकडे लक्ष द्या. फक्त फूड ग्रेड किंवा बीपीए फ्री कंटेनर खरेदी करा. बीपीए हे एक रसायन आहे जे आरोग्याला धोकादायक आहे. तसेच मायक्रोवेव्हमध्ये प्लास्टिकचे कंटेनर ठेवणे टाळा कारण उष्णतेमुळे प्लास्टिकमधून रसायनं बाहेर पडते आणि पदार्थात मिसळते.

**गणेश चंद्रकांत भोईटे, संपादक**



# स्टार प्रवाहची नवी मालिका पाठराखीणमधून दोन नायिका येणार भेटीला

## पाच वर्षांनंतर प्राजक्ता गायकवाडचं मालिका विश्वात दमदार पुनरागमन; तर गौरी इंगवलेची मालिका विश्वात दमदार एण्ट्री

स्टार प्रवाहवर लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे नवी मालिका 'पाठराखीण'. ही गोष्ट आहे प्रत्येक संकटात आणि प्रत्येक वेदनेत एकमेकांच्या पाठीशी खंबीरपणे उभं रहाणाऱ्या भाग्यश्री आणि प्राजक्ता या दोन बहिणींची. बहिणींच्या नात्यातील निस्सीम प्रेम, त्याग आणि जिव्हाळा या मालिकेच्या माध्यमातून प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे. सुख-दुःखात नेहमी सोबत असणाऱ्या या बहिणींचं आयुष्य मात्र एका अनपेक्षित वळणावर बदलतं. परिस्थिती, समाज आणि नियती यांच्या कसोटीवर त्यांचं नातं कसं टिकून रहातं, याची उत्कंठावर्धक मांडणी या मालिकेतून पाहायला मिळणार आहे. स्टार प्रवाहवर लवकरच सुरू होत असलेल्या या मालिकेच्या निमित्ताने सुप्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड तब्बल ५ वर्षांनंतर छोट्या पडद्यावर पुनरागमन करत आहे. तर अनेक सिनेमांच्या माध्यमातून आपल्या अभिनयाची छाप पाडलेली गुणी अभिनेत्री गौरी इंगवले पाठराखीणच्या निमित्ताने मालिका विश्वात दमदार प्रवेश करणार आहे.

पुन्हा एकदा मालिका विश्वात पुनरागमन करताना नेमकी काय भावना आहे हे सांगताना प्राजक्ता म्हणाली, " खूप दिवसांपासून मालिका कधी करणार यासाठी विचारणा होत होती. पाठराखीण मालिकेच्या निमित्ताने ही सुवर्णसंधी चालून आली. स्टार प्रवाह सारखी लोकप्रिय वाहिनी आणि बांदेकर कुटुंबियांची सोहम प्रोडक्शन सारखी निर्मिती



संस्था असताना नाही म्हणण्याचं कारणच नव्हतं. मध्यंतरीच्या काळात बरेच मराठी आणि दाक्षिणात्य चित्रपट केले. अनेक जाहिराती केल्या. टीव्ही हे माझं अत्यंत आवडतं माध्यम आहे. आतापर्यंत साकारलेल्या भूमिकांपेक्षा वेगळी भूमिका आहे. प्राजक्ता कुलकर्णी असं माझ्या व्यक्तिरेखेचं नाव आहे. लहान वयातच आई-वडिलांचं छत्र गमावलेल्या प्राजक्ताचा सांभाळ तिचे मामा चंद्रशेखर वैद्य यांनी केला. तिच्यासाठी मामा-मामी म्हणजे जणू विठ्ठल-रखुमाई. त्यांचा प्रत्येक शब्द तिच्यासाठी अंतिम आहे. वैद्य कुटुंबावर तिचं अपार प्रेम आहे आणि या घराचं भलं व्हावं यासाठी ती काहीही करु शकते. प्रेक्षकांनी या भूमिकेलाही प्रेम द्यावं ही अपेक्षा आहे असं प्राजक्ता म्हणाली.

अभिनेत्री गौरी इंगवले देखिल मालिका विश्वात एण्ट्री घेण्यासाठी खूप उत्सुक आहे. खूप दिवसांपासून मालिका करण्याची इच्छा होती. पाठराखीण मालिकेमुळे माझी इच्छापूर्ती होतेय असं म्हण्टलं तर वावगं ठरणार नाही. टीव्ही माध्यमात काम करण्याचा अनुभव खूप वेगळा आहे. या जगाशी नव्याने ओळख करुन घेतेय. मालिकेच्या माध्यमातून तुम्ही घराघरात पोहोचता. त्यामुळे खूप उत्सुक आहे. माझ्या कुटुंबियांनी देखिल खूप प्रोत्साहन दिलं. त्यामुळेच मी मालिका करण्याचा निर्णय घेतला. मला खात्री आहे ही मालिका आणि या मालिकेतील सगळी पात्रं प्रेक्षकांना नक्की आवडतील.

सोहम आदेश बांदेकर यांच्या सोहम प्रोडक्शनने या मालिकेची निर्मिती केली आहे. सुप्रसिद्ध दिग्दर्शक राहुल लिंगायत या मालिकेचं दिग्दर्शन करणार आहेत.

## संघर्षातून साहित्याकडे आणि अध्यापनातून समाजसेवेकडे

# ठाण्याच्या जया राव यांचा प्रेरणादायी प्रवास

ठाणे शहरात वास्तव्यास असलेल्या श्रीमती जया बाळकृष्ण राव यांचे आयुष्य म्हणजे जिद्द, चिकाटी आणि कर्तृत्वाचा एक देदीप्यमान प्रवास आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या महिला सक्षमीकरण मोहिमेच्या निमित्ताने त्यांचे कार्य समाजासमोर येणे ही गौरवाची बाब आहे. मूळच्या कर्नाटक राज्यातील असलेल्या जया राव यांनी केंद्रीय विद्यालय संघटन अंतर्गत सुमारे ४१ वर्षे इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका आणि विभाग प्रमुख म्हणून प्रदीर्घ सेवा बजावली आहे. पुण्याच्या बी.ई.जी. केंद्रीय विद्यालयातून २००९ मध्ये निवृत्त झालेल्या राव यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानासाठी 'आचार्य अत्रे पुरस्कार' आणि एल.आय.सी. चा 'बेस्ट टीचर पुरस्कार' यांसारख्या मानाच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

त्यांच्या या यशाचा पाया हा अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत रचला गेला होता. गेल्या ४० वर्षांपासून त्यांनी एकल पालकत्वाची जबाबदारी समर्थपणे पेलली आहे. घर, शासकीय नोकरी, मुलांचे शिक्षण आणि वारंवार होणाऱ्या बदल्या अशा अनेक समस्यांना तोंड देत त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना उच्चशिक्षित आणि स्वावलंबी बनवले, जे आज परदेशात स्थायिक आहेत.

जया राव यांचे भाषेवर कमालीचे प्रभुत्व असून मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तिन्ही भाषांमध्ये त्या प्रभावी लेखन आणि काव्य सादरीकरण करतात. विशेषतः कारगिल विजयावर त्यांनी लिहिलेली 'ए टू झेड' वर्णमालेतील कविता आजही अनेकांच्या स्मरणात आहे. निवृत्तीनंतरही त्यांनी स्वतःला विश्रांतीच्या चौकटीत अडकून न ठेवता सामाजिक आणि आध्यात्मिक कार्यात झोकून दिले आहे. त्या केवळ एक उत्कृष्ट शिक्षिकाच नव्हत्या, तर आजही त्या 'ब्रह्मविद्या' आणि प्राचीन योगशास्त्राच्या माध्यमातून लोकांच्या शारीरिक आणि मानसिक उन्नतीसाठी कार्य करत आहेत. कोरोनाच्या कठीण काळात त्यांनी 'हिरकणी पुरस्कार' मिळवून आपली सामाजिक बांधिलकी सिद्ध केली. सध्या त्या ठाण्यातील कोळशेत येथील केंद्रीय विद्यालयात मार्गदर्शनपर भेटी देतात आणि 'उडान' सारख्या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून मुलांसाठी भाषा आणि योगाचे वर्ग विनामूल्य घेतात. त्यांच्या या झंझावाती प्रवासातून हेच सिद्ध होते की, जर मनात इच्छाशक्ती असेल तर वयाची कोणतीही मर्यादा स्त्रीच्या कर्तृत्वात अडथळा ठरू शकत नाही.



## छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा
# लोगोचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते अनावरण

मुंबई : बदलापूर येथे १३ ते १७ मे याकाळात छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा होत असून या स्पर्धेचा आढावा काल मंगळवारी उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला. यावेळी स्पर्धेच्या बोधचिन्हाचे अनावरण उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.
सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस आमदार किसन कथोरे, कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, उपमुख्यमंत्र्यांचे अपर



मुख्य सचिव असीम गुप्ता, क्रीडा विभागाचे उपसंचालक नवनाथ फरताडे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार, महाराष्ट्र व्हिलीबॉल असोसिएशनचे पदाधिकारी आदी उपस्थित होते. ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यावेळी दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.
१८ व २१ वर्षीय मुला मुलींसाठी ही राज्यस्तरीय स्पर्धा असून क्रीडा विभाग आणि कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या माध्यमातून त्याचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठीच्या आयोजन समितीचे अध्यक्ष जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. यावेळी बैठकीत खेळाडूंची निवास आणि भोजन व्यवस्था, मैदान तयारी, आरोग्य व्यवस्था आदी बाबींवर चर्चा करण्यात आली. खेळाडूंच्या निवासाची चांगली व्यवस्था करा त्यासाठी लागणार २५ लाखांचा निधी सिडकोच्या माध्यमातून देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. दरम्यान, यावेळी ठाणे विभागीय क्रिडा संकुलाबाबत देखील आढावा घेण्यात आला.

## 1 जून रोजी नवी मुंबई पालिका लोकशाही दिन

नवी मुंबई : महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या अनुषंगाने दि. 04 मे रोजी आयोजित करण्यात आलेल्या लोकशाही दिनात प्राप्त अर्जाबाबत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी अतिक्रमण विभागाला कार्यवाहीचे आदेश दिले. माहे जून महिन्याचा लोकशाही दिन दि. 01 जून 2026 रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये दि. 18 मे 2026 पर्यंत 'मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे. लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळाच्या (Website) मुख्यपृष्ठावर जलद दुवे (Quick Links) आयकॉनवर उपलब्ध असून तेथून अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते. त्याचप्रमाणे महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से.15 ए, किल्ले गांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथेही प्रत नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध आहे. अर्ज करताना नागरिकांनी शासन निर्णयानुसार अर्जात नमूद तक्रार / निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे याची दखल घ्यावयाची आहे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा.



## ठाण्याला 'ड्रग्ज फ्री' करण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्र यावे
### निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदिप माने

ठाणे : ठाणे जिल्ह्याला अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी केवळ एका विभागाने नाही, तर सर्वच शासकीय विभागांनी समन्वयाने आणि प्रभावीपणे काम करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदिप माने यांनी आज येथे केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात आयोजित 'जिल्हा नार्को को-ऑर्डिनेशन सेंटर' (NCORD) समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

*या बैठकीत डॉ. माने यांनी पोलीस, महसूल, आरोग्य आणि उत्पादन शुल्क विभागाला स्पष्ट निर्देश दिले की, अंमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी या सर्व यंत्रणांनी एकमेकांशी माहितीची देवाणघेवाण करून संयुक्त कारवायांचा वेग वाढवावा. तस्करीच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर द्यावा. अंमली पदार्थांच्या विळख्यातून तरुण पिढीला वाचविण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयीन परिसरामध्ये जनजागृती मोहिमांचे काटेकोर नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, जिल्ह्यातील व्यसनमुक्ती केंद्रांना आवश्यक ते तांत्रिक सहकार्य आणि मार्गदर्शन प्रशासनामार्फत उपलब्ध करून दिले जाईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.*
*या बैठकीला ठाणे शहर पोलीस उपअधीक्षक श्रीमती भोसले, पोलीस निरीक्षक राजेंद्र निकम, समीर शेख, सहायक पोलीस निरीक्षक लहू सातपुते यांच्यासह औद्योगिक सुरक्षा, अन्न व औषध प्रशासन, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद समाज कल्याण, कृषी, केंद्रीय वस्तू व सेवा कर (GST), टपाल आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ठाणे जिल्ह्याला अंमली पदार्थमुक्त करण्याच्या दिशेने जिल्हा प्रशासनाने उचललेले हे एक निर्णायक पाऊल असून, भविष्यातील रणनीतीवरही या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.*

### महापौर शर्मिला पिंपळोलकर यांचे प्रशासनास आदेश
# प्रभाग क्र. 19 मधील प्रलंबित कामांची पाहणी करुन ती तातडीने पूर्ण करावीत

ठाणे (गणेश भोईटे) : ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. 19 मधील रायलादेवी तलाव येथे तातडीने सुरक्षा रक्षक नेमावेत, तसेच शाळा क्र. ३२/१२६ मधील उर्दु माध्यमाची शाळा आठवीपर्यंतच असून नववी व दहावीचे वर्ग सुरू तेथील प्राच्य विद्या संस्थेतील जागेची पाहणी करुन त्या ठिकाणी सुरू करता येतील का ते पहावे, तसेच प्रभागातील पावसाळ्यापूर्वी आवश्यक असलेली सर्व कामे करण्याच्या सूचना नुकत्याच झालेल्या बैठकीत महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी संबंधित विभागाला दिल्या.



"प्रभाग क्र. 19 मधील प्रलंबित असलेल्या कामांबाबत स्थानिक नगरसेवक विकास रेपाळे, नम्रता भोसले, रविंद्र फाटक, मीनल संख्ये यांनी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांची भेट घेतली होती. याबाबत महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली, या बैठकीस उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, नगरअभियंता प्रशांत सोनग्रा, उपायुक्त मिताली संचेती, मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान, सहाय्यक आयुक्त राजेश सोनावणे, सर्व स्थानिक नगरसेवक व विविध विभागांचे सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत शिक्षण, स्वच्छता, सुरक्षा आणि सुशोभीकरणाशी संबंधित अनेक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. हाजुरी येथील उर्दु शाळा क्र. ३२/ १२६ च्या पटांगणात असलेले बांधकाम काढून विद्यार्थ्यांसाठी मोकळे मैदान उपलब्ध करुन द्यावते तसेच पटागणांलगत असलेल्या इमारतीतील 3 मजले प्राच्य विद्या अभ्यास संस्थेला दिले असून या इमारतीतील दोन मजले उर्दु शाळेसाठी द्यावेत जेणेकरुन उर्दु माध्यमाच्या नववी व दहावीचे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत अशी मागणी नगरसेवक विकास रेपाळे यांनी केली. तसेच प्राच्य विद्या अभ्यास संस्थेच्या आवारात देखील मोकळी जागा असून तेथेही वर्ग खोल्या तयार करता येवू शकतील अशीही सूचना नगरसेविका नम्रता भोसले यांनी केली. यावर सदर इमारतीची पाहणी करुन याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना महापौरांनी दिली.

दरम्यान, प्रभाग क्रमांक 19 मधील रायलादेवी तलाव परिसरातील वाढत्या अस्वच्छता आणि सुरक्षेच्या समस्यांही यावेळी बैठकीत मांडण्यात आली. तलाव परिसरात मद्यपान, नशेखोरी, कचरा साचणे आणि सुरक्षेअभावी गैरप्रकार वाढत असल्याचे निदर्शनास येत असून या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमण्याची मागणी नगरसेवक विकास रेपाळे व नगरसेविका नम्रता भोसले-जाधव यांनी केली. महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी तलावाच्या दोन्ही प्रवेशद्वारांवर सुरक्षारक्षक नेमण्याचे निर्देश सुरक्षारक्षकांना दिले.

हाजुरी विभागातील शाळा क्रमांक ३९ येथे "डि मार्ट संस्थेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळे" संदर्भातही चर्चा झाली. वाढत्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा विचार करून अतिरिक्त वर्गांची गरज आणि इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची वाढती मागणी लक्षात घेऊन या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

### शहरातील सर्व तलावातील गाळ काढण्याबाबत प्रस्ताव तयार करावा

याशिवाय, पावसाळ्यापूर्वी आवश्यक कामे पूर्ण करण्याच्या सूचना महापौरांनी संबंधित विभागाला दिल्या.. प्रभाग क्रमांक 19 मधील तीन हात नाका परिसरातील उड्डाणपुलाखालील सुशोभीकरणाच्या कामांमध्ये होत असलेल्या दुर्लक्षावरही नाराजी व्यक्त करण्यात आली. या ठिकाणी नियमित स्वच्छता, सुशोभीकरणाची अंमलबजावणी आणि संबंधित कंत्राटदारांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली.
रायलादेवी तलावात मोठ्या प्रमाणावर गाळ असून हा गाळ काढण्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला, यावेळी महापौर शर्मिला पिंपळोलकर व सभागृह नेते हणमंत जगदाळे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे शहरातील सर्व तलावांतील गाळ काढण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत, याबाबत महापौरांनी शहरातील सर्व तलावांमधील गाळ काढण्याबाबत एकत्रित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना या बैठकीत दिल्या.

## गुरूवार, शुक्रवार ठाण्यात पाणी नाही

ठाणे : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत करण्यात येणाऱ्या देखभाल व दुरुस्तीच्या कामामुळे ठाणे शहरातील काही भागांमध्ये 24 तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे. गुरुवार, 7 मे 2026 रोजी दुपारी 12.00 वाजल्यापासून ते शुक्रवार, 8 मे 2026 रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत हा शटडाऊन लागू राहणार आहे. जांभूळ जलशुद्धीकरण केंद्रातील जलाशय (HSR) येथे बारवी गुरुत्ववाहिनी क्रमांक १, २ व ३ वर उन्नतीकरण तसेच तातडीच्या देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. या कालावधीत दिवा, मुंब्रा (प्रभाग क्र. 26 व 31) मधील काही भाग वगळता), कळवा या प्रभाग समित्यांतील सर्व भागांमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे. तसेच वागळे प्रभाग समितीतील रुपादेवी पाडा, किसननगर क्र. 2, नेहरूनगर आणि मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत कोलशेत खालचा गाव या भागांचा पाणीपुरवठा 24 तासांसाठी बंद राहणार आहे. पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील 1 ते 2 दिवस कमी दाबाने पाणी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक तेवढे पाणी साठवून ठेवावे व पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## नमुंमपा आरोग्य सेवेचा नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी घेतला सविस्तर आढावा

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने पुरविल्या जात असलेल्या आरोग्य सेवांच्या गुणवत्ता वाढीसाठी नियोजनबध्द पावले उचलण्याच्या दृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी आरोग्य विभागातील प्रमुख वैद्यकीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेत प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रापासून सार्वजनिक रुग्णालयापर्यंत सर्व ठिकाणी दिल्या जाणाऱ्या सेवांचे मुख्यालय पातळीवर नियमितपणे मूल्यमापन करावे व त्यात सुधारणा करावी असे निर्देश दिले.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.राजेश म्हात्रे आणि तिन्ही सार्वजनिक रुग्णालयांचे वैदयकीय अधिक्षक, माता बाल रुग्णालयांचे वैदयकीय अधिकारी व आरोग्य विषयक कार्यक्रमांचे वैद्यकीय अधिकारी तसेच नमुंमपा पीजी मेडिकल संस्थेचे डीन डॉ. ज्ञानेश बेलेकर उपस्थित होते.
महानगरपालिकेच्या वतीने क्षेत्रीय स्तरावर 26 प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून वैदयकीय तपासणी व उपचार केले जातात. येथून संकलित होणारी नागरिकांच्या आरोग्य स्थितीची माहिती अचूक व अद्ययावत असावी याकडे कटाक्षाने लक्ष देण्याचे निर्देश देतानाच या माहितीची मुख्यालय स्तरावरुन आढावा घेऊन पडताळणी करण्यात यावी असे निर्देशित करण्यात आले. अशाच प्रकारे माता बाल रूग्णालये व सार्वजनिक रूग्णालये येथील रूग्ण व उपचारांचाही नियमित आढावा घेण्यात यावा अशा सूचना देण्यात आल्या.
महानगरपालिकेमार्फत नियमितपणे सुरु असणारे लसीकरण कार्यक्रम, तपासणी मोहीमा, आरोग्य शिबीरे याचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा यादृष्टीने अधिक प्रभावी कामगिरी व्हायला हवी असे सूचित करतानाच यामध्ये स्थानिक नगरसेवकांचा सक्रिय सहभाग घ्यावा जेणेकरुन जास्तीत जास्त नागरिक यामध्ये सहभागी होतील असे आयुक्तांनी सूचित केले.
पालिका क्षेत्रातील मागील तीन वर्षांतील जन्मदर व मृत्यूदराचा वर्षनिहाय आढावा घेताना आयुक्तांनी प्रत्येक मृत्यूची कारणमीमांसा करुन डेथ ऑडिट करावे आणि मृत्यूमागील कारणांचा अभ्यास करुन पुढील काळातील सुयोग्य उपचारांसाठी व मृत्यूदर कमी करण्यासाठी त्याचा उपयोग करुन घ्यावा असे निर्देशित केले. आरोग्यशास्त्र हे संशोधन व चिकित्सेवर अवलंबून असल्याने तशा प्रकारे अभ्यास करुन सेवेची गुणवत्ता वाढविण्यावर भर दयावा असे आयुक्तांनी सूचित केले.

## ठाण्यात रंगली हिमालया बेबीकेअरची 'हेल्दी बेबी स्पर्धा'

■ बालआरोग्याबाबत जनजागृती,~ठाण्यातील समुदाय उपक्रमातून पालक आणि आरोग्य तज्ज्ञ एकत्र; सर्वांगीण बालसंगोपनावर भर

ठाणे : हिमालया बेबीकेअर या अग्रगण्य बेबी केअर ब्रँडने स्माईल फाउंडेशन यांच्या सहकार्याने ठाण्यात 'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट' आयोजित केली होती. या उपक्रमात माता, बालके, समुदाय आरोग्य कर्मचारी आणि बालसंगोपन तज्ज्ञ एकत्र येऊन सर्वांगीण बालविकास, मातृआरोग्य आणि बालसंगोपनाविषयी जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. या उपक्रमात १८५ पेक्षा जास्त माता आणि त्यांच्या बालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. आरोग्य तज्ज्ञ तसेच स्माईल फाउंडेशनच्या कार्यक्रम पथकाच्या उपस्थितीत हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. बालकांचे मूल्यांकन मोटर स्किल्स, उंची, वजन आणि सक्रियता यांसारख्या विकासात्मक निकषांवर करण्यात आले.
या स्पर्धेत अक्षता विवेक वाघ व




रियांश अक्षय भोईर यांनी प्रथम क्रमांक, मनीषा व ज्ञानेश अनिल बाग यांनी द्वितीय क्रमांक, तर दर्शन गणेश भोपी व बाबू दिनेश बोस तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना प्रमाणपत्र आणि हिमालय बेबी गिफ्ट पॅक देण्यात आला. सर्व सहभागींसाठी सहभाग प्रमाणपत्र, माइलस्टोन बुकलेट आणि हिमालय बेबीकेअर सॅम्पल पॅक असलेली गिफ्ट बॅग देण्यात आली.स्पर्धेसोबतच मातांना स्तनपान, बालपोषण, स्वच्छता, लसीकरण वेळापत्रक आणि बालसंगोपनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे आरोग्यदायी व माहितीपूर्ण पालकत्वाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.
या उपक्रमाबाबत हिमालया वेलनेस कंपनीचे बेबीकेअर विभागाचे संचालक चक्रवर्ती एन. व्ही. म्हणाले, "बाळाच्या आयुष्यातील सुरुवातीची वर्षे ही विकासासाठी अत्यंत महत्त्वाची असतात. 'हेल्दी बेबी स्पर्धेच्या 'च्या माध्यमातून पालकांना आवश्यक वैद्यकीय माहिती आणि साधने उपलब्ध करून देणे हा आमचा उद्देश आहे. स्थानिक संस्थांसोबत काम करताना आम्ही सुरक्षित, सौम्य आणि माहितीपूर्ण बालसंगोपनाचा संदेश तळागाळापर्यंत पोहोचवत आहोत." तर स्माईल फाउंडेशनच्या 'स्वाभिमान' कार्यक्रमाच्या प्रमुख सरिता प्रधान म्हणाल्या, "मातृ व बालआरोग्य बळकट करण्यासाठी प्रारंभिक पोषण, योग्य काळजी आणि जागरूकता अत्यंत आवश्यक आहे. हिमालय वेलनेसच्या सहकार्याने पीएचसी शेवाळे आणि मफासा येथे आयोजित या उपक्रमातून आम्ही १८५ पेक्षा जास्त माता व बालकांपर्यंत थेट पोहोचलो."
'हेल्दी बेबी स्पर्धेच्या माध्यमातून मातांना तज्ज्ञांशी संवाद साधण्याची, बालसंगोपनाच्या महत्त्वाच्या बाबी जाणून घेण्याची आणि निरोगी पालकत्वाचा आनंद साजरा करण्याची संधी मिळाली. अशा समुदायाभिमुख उपक्रमांद्वारे हिमालय बेबीकेअर पालकांना आवश्यक ज्ञान व साधने उपलब्ध करून देत निरोगी आणि आनंदी बालकांच्या संगोपनासाठी आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित करत आहे.

## सीकेटी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्रा. काकासाहेब निवृत्ती ढवळे यांचा सेवापूर्ती गौरवदिन

पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) च्या कर्मचारी कल्याण समितीने महाविद्यालयातील मानव्यविद्याशाखेच्या अर्थशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक काकासाहेब निवृत्ती ढवळे यांचा सेवापूर्ती गौरव दिन समारंभ मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उत्साहात पार पडला. यावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांची प्रमुख उपस्थिती राहिली.
सेवापूर्ती समारोहाची सुरवात संस्थेच्या आदर्शस्थानी असणाऱ्या विभूतींचे प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली, यानंतर व्यासपीठावरील मान्यवरांचे औपचारिक स्वागत झाल्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना कमर्चारी कल्याण समितीच्या सदस्या डॉ. श्वेता हुंबरवाडी यांनी समितीच्या माध्यमातून आयोजित केल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी उपक्रमांचा आढावा दिला तथा समारोहाचे सत्कारमूर्ती प्रा. काकासाहेब निवृत्ती ढवळे यांचा परिचय देत, त्यांच्या संस्थेमधील २७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवाचा उल्लेख करत महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख, जिमखाना असोसिएशन, परीक्षा विभाग, नॅक क्रायटेरिया, राष्ट्रीय सेवा योजना, कर्मचारी कल्याण समिती, महिला विकास कक्ष, अश्या जवळपास प्रत्येक महत्वपूर्ण समितींमध्ये दिलेल्या स्पृहनीय योगदानाचा उल्लेख केला.
यानंतर शिक्षक आणि शिक्षकेत्तर सहकाऱ्यांनी प्रा. काकासाहेब ढवळे यांच्या स्मृतींना उजाळा देताना तानाजी देशमुख, प्रा. हरिभाऊ खरात, डॉ. राजेश येवले, प्रो.डॉ. बाळासाहेब पाटील, प्रो. डॉ. सुधाकर यादव, प्रो. डॉ. बाळासाहेब आघाव आणि डॉ. राजेंद्र परमार यांनी मनोगते व्यक्त केलीत. यासोबतच प्रा. काकासाहेब ढवळे यांच्या सुकन्या सौ. निकिता औटी आणि व्याही सुभाषराव काळाणे यांनी भावनांची अभिव्यक्ती केली.




समारोहाचे अध्यक्ष जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे यांच्या हस्ते प्रा. काकासाहेब ढवळे यांचा सेवापूर्ती झाल्याबद्दल शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला, याबरोबरच सत्कारमूर्तींच्या सहचारिणी वैशाली ढवळे यांचा सत्कार डॉ. ज्योत्स्ना ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला. याच बरोबर महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभाग तथा त्यांच्या आप्तेष्ट मंडळींकडूनही त्यांचा गौरव करण्यात आला.
सत्कार संपन्न झाल्यानंतर सत्कारमूर्ती प्रा. काकासाहेब ढवळे यांनी आपल्या सेवेच्या कालावधीतील सर्वांनी दिलेली आदरपूर्वक वागणूक, प्रेम आणि शुभेच्छा यांचा स्वीकार करत, आपल्या उत्तरपर भाषणात त्यांनी महाविद्यालय, सहकारी प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आपल्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणा, सातत्य आणि समाजसेवा या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी जीवनात सकारात्मक दृष्टिकोन ठेवून समाजासाठी कार्य करावे, असा संदेश त्यांनी दिला.
महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील यांनी प्रा. काकासाहेब ढवळे यांना भविष्यकालीन वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्याच अपितु हा सेवापूर्ती समारंभ शेवट नसून एका नवीन अध्यायाची सुरवात असल्याचे विधान केले तसेच कुटुंब आणि आरोग्य यांचा सांभाळ व त्यास प्राधान्य देण्याबाबतचा सल्ला दिला.
सेवापूर्ती गौरव दिनाचे अध्यक्ष तथा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. काकासाहेब ढवळे यांच्या २७ वर्षांच्या प्रदीर्घ, निष्ठावंत आणि समर्पित कार्याचे मनःपूर्वक कौतुक केले. त्यांनी नमूद केले की, महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासामध्ये प्रत्येक कर्मचाऱ्याचा महत्त्वाचा वाटा असतो आणि प्रा. ढवळे यांसारख्या कर्तृत्ववान शिक्षकांमुळेच संस्थेची ओळख अधिक भक्कम होते. सेवापूर्ती हा आयुष्याचा शेवट नसून एका नव्या पर्वाची सुरुवात असून पुढील काळात त्यांनी कुटुंब, आरोग्य आणि समाजसेवेला प्राधान्य द्यावे, असा सल्ला देत त्यांनी अशा गौरव समारंभांची परंपरा पुढेही कायम ठेवण्याचे आवाहन केले.
यावेळी व्यासपीठावर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील, सत्कारमूर्ती प्रा. काकासाहेब ढवळे व त्यांच्या पत्नी सौ. वैशाली ढवळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो.डॉ. बाळासाहेब आघाव, मानव्यविद्याशाखेचे शाखाधिपती प्रो.डॉ. बाळासाहेब पाटील, वाणिज्यशाखेचे शाखाधिपती प्रो. डॉ. सुधाकर यादव, विज्ञानशाखेच्या शाखाधीपती डॉ. ज्योत्स्ना ठाकूर, कर्मचारी कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र परमार, शिक्षक आणि शिक्षकेत्तर सहकारी आणि सत्कार्मुर्तींचे आपेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.
यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन आभार राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र परमार यांच्या नेतृत्वाखाली समितीच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१